Tittle Code: MAHMUL03916 PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# Knowledge Flame

International Multidisciplinary Research Journal (KF-IMRJ)

https://knowledgeflame.in

Issue: 02 Volume: 01 January-2025

## Chief Editor

Dr. Ram Raunekar
Professor & Head, Department of Marathi,
MSS, Arts, Science & Commerce College,
Ambad, Dist. Jalna, Maharashtra (India).
dr.rbr@knowledgeflame.in

## Editor, Published & Owned By

Mr. Krushna Nagwe
Assistant Professor, Department of History,
MSS, Arts, Science & Commerce College,
Ambad, Dist. Jalna (MS)
Kn@knowledgeflame.in

## Published At

Plot No. 163, Shivaji Nagar, Mhada Cology,
Ambad Choufully, Jalna-431203

## Printed by

Mandar Offset & Printers
Plot No. 43, Vrundavan Colony, Kacheri Road,
Old Jalna, Dist. Jalna-431203 (Maharashtra)

https://knowledgeflame.in Tittle Code: MAHMUL03916 PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)

# Index (अनुक्रमणिका)


| Sr. No | Authors/Researchers Name | Research Title | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. संदिप गोरख साळवे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना येणाऱ्या आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचा अभ्यास | 01-07 |
| 2. | Adv. Jyoti Kapale | The Migration Attitudes of Rural Youth toward Relocating to Metro Cities for Employment | 08- 10 |
| 3. | Suwarna J. Kachare | 'Racial Injustice and Resistance in Toni Morrison's Beloved'. | 11-17 |
| 4. | Miss. Anjali Kishor Dangare | The Legacy of Slavery in Toni Morrison's Beloved: An Exploration of Trauma and Memory | 18-23 |
| 5. | Sandeep Vishnu Kadam | A Study of Government's Role in the Sugar Industry in Maharashtra: Policies, Challenges and Opportunities | 24-28 |
| 6. | Vikas Kailas Rathod | The Evolution and Impact of E-Commerce: Opportunities, Challenges, and Future Prospects | 29-32 |
| 7. | Mr. Kishor Kantarao Dakhane | Importance of Laptop in Video Conferencing and E-Learning at Higher Education | 33-40 |
| 8. | Sulakshana Venakatrao Kale | "A Study of Digital Services of Icici Bank Special Reference to Chhatrapati Sambhajinagar District" | 41-49 |
| 9. | Dipika Arjun korade | Analysis of Financial Inclusion and Economic Growth in Emerging Markets | 50-55 |
| 10. | सुरेश श्रीराम इंगोले | संयुक्त राष्ट्र संघ व भारताची भूमिका : एक अभ्यास | 56-60 |

https://knowledgeflame.in Tittle Code: MAHMUL03916 PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)

# संयुक्त राष्ट्र संघ व भारताची भूमिका : एक अभ्यास

**सुरेश श्रीराम इंगोले**
संशोधक विद्यार्थी
मिलींद कला महाविद्यालय, नागसेनवन, छ. संभाजीनगर
मो. ७७९८८५९४१६
ई मेल : sureshingole4@gmail.com

---

**प्रस्तावना:**

पहिल्या महायुध्दानंतर जागतिक शांतता टिकविण्यात राष्ट्रसंघ स्थापन झाला तो उद्देश्य पूर्ण न झाल्याने द्वितीय महायुध्द सुरू झाल. दूसरे महायुध्द चालू असतनांनाच मित्र राष्ट्रांनी नवीन जागतिक संघटना स्थापन करण्याचे ठरविले होते. जागतिक पातळीवर सुरक्षा आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना करण्यात आली.

ही संघटना स्थापना होण्यामागचे कारण, पहिल्या व दुस-या महायुध्दात जगाचा झालेला नाश, त्याचबरोबर जगातील प्रत्येक देशांची सत्ता सर्वात मोठी सत्ता असली पाहिजे. या हेतून येरोपियन देश संघटित झाले आणि औद्योगिक युध्दाला सुरवात झाली. याचा परिणाम जवळपास ८५ लाख सशक्त सैनिक मारले गेले आणि २ करोड १० लाख सैनिक घायाळ झाले तर १ करोड गरीब नागरिक या यध्दात मारले गेले. १९१८ मध्ये युध्द समाप्त झाले. या युध्दाने युरोपला सामाजिक, आर्थिक, राजनैतिक फार मोठ्या संकटात टाकले होते. अशा प्रकारे युध्द हे जगाच्या शांततेत बाधा निर्माण करून देशाला परिणामी जगाला नाशाकडे नेईल हा धोका टाळण्यासाठी दुस-या महायुध्दात जिंकलेले देश (अमेरिका, फ्रान्स, रूस, स्पेन) समोर येऊन आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन केली.

संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये सदस्य संख्या २००६ पर्यंत १९२ एवढी होती. २८ जून २००६ मध्ये मॉटेनिग्रो या देशाचा समावेश होऊन आज संयुक्त राष्ट्र संघटना सदस्य-१९३ आहे. ३० ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाचा सदस्य बनला. संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय अमेरिका न्युयॉर्क शहरात आहे. संयुक्त राष्ट्राने सहा भाषांना 'राजभाषा' म्हणून स्वीकृती दिली आहे. त्यामध्ये अरबी,

चिनी, इंग्लिश, फ्रान्सी, रूसी आणि स्पेनी यांचा समावेश होतो. इंग्रजी आणि फ्रान्सी दोन भाषांचा संचलनासाठी उपयोग केला जातो.

**संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्ट्ये :**

- आंतरराष्ट्रीय सुरक्षितता व शांतता राखणे, आक्रमण झाल्यास अथवा शांततेचा भंग झाल्यास शांततेच्या मार्गाने व आंतरराष्ट्रीय कायद्याला धरून सामुदायिक उपाय करणे.
- सभासद राष्ट्रांनी परस्पर मित्रत्त्वाचे संबंध स्थापन करणे. हे संबंध समान अधिकार व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर आधारित असतील. सभासद राष्ट्रे जागतिक शांतता दृढ करण्याचा प्रयत्न करतील.
- आंततराष्ट्रीय स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवीय प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळवणे, मानवीय हक्क व मानवीय स्वातंत्र्य, सर्वांना लिंग, भाषा किंवा धर्माचा विचार न करता उपलब्ध करून देणे.
- वरिल ध्येय साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रास केंद्र मानुन राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारात सुसंवाद स्थापन करणे.

**संयुक्त राष्ट्राची मूलतत्त्वे :**

- संयुक्त राष्ट्रसंघाची रचना सभासदत्त्वाचे सार्वभौम समानतेच्या दर्जानुसार झाली आहे.
- सर्व सभासद राज्ये सभासदत्त्वाचे लाभ प्राप्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या कर्तव्यांचे पालन करतील.
- सर्व सभासद राज्ये आपापसातील आंतरराष्ट्रीय वाद, शांतता, सुरक्षितता व न्याय यांना धक्का लागू देणार नाही.
- सर्व सभासद राष्ट्रे युनोच्या सामुहीक कार्यवाहीला मदत करतील. विरोधक राष्ट्रांस कोणतेही सभासद राष्ट्र मदत करणार नाही.
- संयुक्त राष्ट्र सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करणार नाही.

**बदलती परिस्थिती व संयुक्त राष्ट्रः**

मध्यंतरीच्या काळातील अण्वस्त्र निर्मिती, शीतयुध्दे व विचारधारांच्या संघर्षामुळे संयुक्त राष्ट्राच्या कार्यात अनेक अडथळे निर्माण झाले होते. परंतु मागील पाच दहा वर्षाचा जागतिक राजकारणांचा आढावा घेतल्यास जगातील संघर्षमय वातावरण निवळू लागले आहे असे दिसते. अनेक कारणांमुळे जग एकत्र येत आहे. संघर्षाऐवजी सहकार्याचे व सहजीवनाचे वातावरण निर्माण होत आहे.

अमेरिका व साम्यवादी चीनने वैमनस्य कमी झाले असून ह्या दोन्ही राष्ट्रात सहकार्याची भावना निर्माण होत आहे. या सर्व घटनांचा संयुक्त राष्ट्राच्या कार्यांवर व वातावरणावर परिणाम झाला आहे.

**भारताची भूमिका :**

भारताने सुरवातीपासूनच अलिप्ततावादी भूमिका घेतली होती, का रण अमेरिका व ज्यांचा मित्रराष्ट्रांचा गट व दुसरीकडे सोव्हिएत रशिया व ज्यांचा एक गट होता, परंतु पंडित नेहरू यांनी सुरवातीपासूनच अलिप्ततावादी धोरणांचा अंगिकार केला होता. म्हणजेच आपले स्वतंत्र्य असे अस्तित्व त्यांनी टिकवून ठेवले होते. पुढे चालून अलिप्त राष्ट्रांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हा गट संयुक्त राष्ट्राला यशस्वी करण्याचा व जागतिक तनाव कमी करण्याचा प्रयत्न करित आहे. राष्ट्राचे सामंजस्य व सहकार्य यावरचा ह्या संघटनेचे भवितव्य अवलंबून आहे आज अखिल मानववेच्या संरक्षणाचे अंतिम आधारस्थान संयुक्त राष्ट्रसंघाचे आहे.

अमेरिका संयुक्त राष्ट्रांच्या निर्णयाचा किंवा आदेशाचा विचार न करता कुवेत प्रश्नावर इराकवर हल्ले केले व इराकमध्ये सद्दाम हुसेन यांची सत्ता संपुष्टात आणून ज्यांचा शिरच्छेद केला व आपल्या विचारांचे सरकार तिथे स्थापन केले. सोव्हिएत संघराज्याच्या पतनानंतर आणि मॉस्कोच्या परराष्ट्र धोरणातील भूमिकेबाबत तिस-या जगातील राष्ट्रांनी कठोर टीका केली आहे. यात प्रामुख्याने भारतानेही महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. युनोला आपली कर्तव्य चोखपणे पार पाडता येण्यासाठी युनोमध्ये संरचनात्मक सुधारणा करावी असा आग्रह तिस-या जागतील राष्ट्रे धरित आहेत. हे सर्व चालू असतांनाही राष्ट्र प्रमुख ऐमेकांच्या राष्ट्रांना भेटी देत आहेत.

राष्ट्रवादाची स्थापना विस्कळीत होऊन आंततराष्ट्रीयवादाची भावना निर्माण होत आहे. राष्ट्राचे सामंजस्य व सहकार्य यावरच ह्या संघटनेचे भवितव्य अवलंबून आहे. आज अखिल मानवतेच्या संरक्षणाचे अंतिम आधारस्थान संयुक्त राष्ट्रसंघच आहे. संयुक्त राष्ट्राचे भवितव्य उज्वल आहे. यात शंका नाही.

भारताने संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासूनच त्यांच्या मुलभूत हेतुंना व भूमिकेला सक्रीय पाठींबा तर दिलाच आहे, एवढेच नाही तर या हेतुंच्या अंमलबजावणीसाठी म्हणून सर्वतोपरीने मदतही केली

आहे. याचे कारण भारताच्या ऐतिहासिक वारसात सापडते. भारताने सतत शांतता, सहकार्य व सहिष्णुतेचा स्थापना ठेवलेली आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. संयुक्त राष्ट्र संघटनेचे कामकाज समजावून घेणे/समजून घेणे.
२. संयुक्त राष्ट्र सदस्य राष्ट्रात मैत्रीपूर्ण संबंध कसे टिकवून ठेवता येतील याचा अभ्यास करणे.
३. सदस्य राष्ट्रातील वाद तंटे विवाद किंवा राष्ट्रा राष्ट्रात कोणत्याही मुद्यावर शत्रु भावना निर्माण झाल्यावर संयुक्त राष्ट्र संघटना कशी काम करेल याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहतके :**

१. जगातील राष्ट्रा राष्ट्रात शांतता प्रस्थपित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र महत्त्वाचा दुवा म्हणून काम करीत असते.
२. राष्ट्रा राष्ट्रात त्याचे स्वातंत्र्य किंवा सार्वभौमत्व टिकवून ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्र महत्त्वाची भुमिका पार पाडत असतेस.
३. प्रत्येक राष्ट्राला आपले सार्वभौमत्व अबाधित ठेवून इतर दुस-या राष्ट्राला कोणताच त्रास होणार नाही याची काळजी संयुक्त राष्ट्र घेते

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात विश्लेषण साहित्य समीक्षा व तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे आणि माहिती व तथ्य संकलन करून ही संशोधन प्रकिया पुर्ण करण्यात आलेली आहे.

**निष्कर्ष :**

सदस्य राष्ट्राच्या विकासात किंवा मैत्री पूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी किंवा त्यांचा वि कास करण्यासाठी संयुक्त राष्ट्र महत्त्वाची भूमिका पार पाडते. तसेच शांतता असो, युध्द असो सदस्य देशांना किंवा राष्ट्रांना शांतता प्रस्थापित करण्यासाठी मदत करते किंवा जागतिक पातळीवर सुरक्षा आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सहकार्य करीत असते. आंतराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन केली गेली आहे.

**संदर्भ :**

१. डॉ. शिक्षा राणी - संयुक्त राष्ट्र एक परिचय

२. प्रा. जॉन्सन बोर्जेस - संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना

३. डॉ. व्ही. वाय. जाधव - संयुक्त राष्ट्र संघटना

४. डॉ. वैकुंठनाथ सिंह - संयुक्त राष्ट्र संघ

५. संचिता सिंह – संयुक्त राष्ट्र संघ आणि भारत